

श्री गोविंदसिंह राठोड शिक्षण प्रसारक मंडळ, दहातोंडा
द्वारा संचालित

# श्री. डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय,

मूर्तिजापूर - ४४४१०६, जि. अकोला.
Email : artssciencecollege@rediffmail.com Website : www.rgrcollmzr.org
Ph. No. 07256-243951, Fax No. 07256-242021

**NAAC - CGPA : 2.63**



# दमयंति

## २०१७-१८

# आमची स्फूर्तिस्थाने



स्व. गोविंदसिंह राठोड




स्व. संजयभाऊ राठोड



स्व. सुनिल राठोड

## आमचे संजिवक



मा.डॉ. आर.जी. राठोड
संस्थापक अध्यक्ष



मा.सौ. दमयंतीताई आर. राठोड
उपाध्यक्षा

## - मार्गदर्शक -



मा.डॉ.व्ही.आर. राठोड
सचिव



मा.डॉ. ए. आर. राठोड
सहसचिव



मा.डॉ. एम. जी. राठोड
सदस्य

# Shri. Dr. R.G. Rathod Arts & Science College, Murtizapur
## Dist. Akola

## Achievements of College Students



**Ms. Amrin Shaikh**
Topper Student
B. Sc. I CBZ



**Ms. Ankita Bhad**
Topper Student
B. Sc. II CBZ



**Ms. Amera Chaus**
Topper Student
B. Sc. III CBZ



**Mr. Mukesh Rathod**
Topper Student
B. Sc. I PCM



**Ms. Rina Atote**
Topper Student
B. Sc. II PCM



**Mr. Girdhar Gawai**
Topper Student
B. Sc. III PCM



**Ms. Sabafirdos Ali**
Topper Student
B. Sc. I CPM



**Ms. Mithila Borkar**
Topper Student
B. Sc. II CPM



**Ms. Chandani Sharma**
Topper Student
B. Sc. III CPM

# Shri. Dr. R.G. Rathod Arts & Science College, Murtizapur
## Dist. Akola

## Achievements of College Students



**Ms. Sonali Mehasare**
Topper Student
B. A. I



**Ms. Priyanka Mehasare**
Topper Student
B. A. II



**Ms. Dipali Bhagwat**
Topper Student
B. A. III



**Mr. Nitin Lende**
Cultural Representative
Session 2017-2018



**Mr. Purushottam Jayaswal**
NSS Representative
Session 2017-2018



**Ms. Sonali Jamnikar**
Sports Representative
Session 2017-2018



**Mr. Bhushan Thakare**
Best Student
Session 2017-2018



**Ms. Megha Sharma**
Best Student
Session 2017-2018

# Shri. Dr. R.G. Rathod Arts & Science College, Murtizapur
## Dist. Akola



Felicitation of Cricketer




NSS Activity




Guest Lecture of Geography Dept.




Mathematics Workshop



Marathi Department Function

# Shri. Dr. R.G. Rathod Arts & Science College, Murtizapur

## Dist. Akola




Mathematics Workshop




Function of Library Dept.



Department of Sport Seminar



Function of Physics Dept.



Allumni Meet

श्री गोविंदसिंह राठोड शिक्षण प्रसारक मंडळ, दहातोंडा द्वारा संचालित

## श्री.डॉ. आर.जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय

मूर्तिजापूर

# दमयंति

**२०१७-२०१८**

**मार्गदर्शक**

## मा.डॉ. आर. जी. राठोड

**संपादन समिती**

प्रा.एस.के. शाह
प्रा.डॉ. ए.एस. निमकर
प्रा.डॉ. पी.एम. माकोडे
प्रा.जी.डी. शेंडे
प्रा. एन.पी. भालेराव
प्रा.व्ही.व्ही. कपीले
प्रा.डॉ. ए.एस. तानकर
प्रा.डॉ. एस.एस. कवर

**विद्यार्थी संपादक**

कु. रितु मौर्य
कु. मेघा शर्मा

**मुद्रक :**
**श्री. गुरुदेव प्रिन्टर्स,**
महात्मा फुले संकुल, अभियंता भवन समोर,
शेगांव नाका, अमरावती.
मो. ९७६६६५६६२०

**प्रकाशक :**
**प्राचार्य डॉ. ए.पी. चर्जन**
श्री.डॉ. आर.जी. राठोड, कला व विज्ञान महाविद्यालय, मूर्तिजापूर

टीप :- साहित्यातुन व्यक्त झालेली मते त्या-त्या कवी, लेखकांची समजावीत.

# अध्यक्षीय मनोगत...

गाव हा विश्वाचा नकाशा,

गावावरुन देशाची परिक्षा...

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतुन गावाच्या उन्नतीचा उपरोक्त संदेश दिला आहे. परंतु आजही ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची समाधानकारक सोय उपलब्ध झालेली नाही. आमच्याही परीसरात विज्ञान शाखेच्या उच्च शिक्षणाची सोय नव्हती, याची खंत मनाला सतत वाटत होती. शेवटी निग्रह करून विज्ञानशाखेबरोबर कला शाखेची सोय उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली. अनेक अडचणींना सामोरे जाऊन महाविद्यालय सतत पुढे-पुढे वाटचाल करीत आहे.

महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सदैव कटिबध्द आहे. त्यामुळेच महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी सदैव वेगवेगळे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. त्यापैकी एक म्हणजे 'दमयंति' वार्षिकांक हा होय. वार्षिकांकातून विद्यार्थ्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध असते. या अंकातही विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांना मोकळी वाट करून दिली. त्यामुळे त्यांचे मनस्वी कौतुक करावेसे वाटते.

वार्षिकांक निर्मितीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. चर्जन, संपादक मंडळ व प्राध्यापक वृंदांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. वार्षिकांकास शुभेच्छा व्यक्त करून माझ्या शब्दांना विराम देतो.

**डॉ. आर.जी. राठोड**

अध्यक्ष, श्री. गो.रा.शि.प्र.मं. दहातोंडा

# प्राचार्यांच्या लेखनीतून...

आमचे महाविद्यालय सामाजिक बांधिलकीतून निर्माण झालेले आहे. खडतर परिस्थितीतून उत्थानाच्या दिशेने झेप घेऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही सदैव प्रयत्नशिल असतो. त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न असतो. त्यासाठी आमच्या लाडक्या विद्यार्थ्यांना वेळोवेळी विविध उपक्रमातून संधी उपलब्ध करून देत आलो आहेत.

आजुबाजुच्या परिस्थितीचे भान ठेवणाऱ्या व त्यांना शब्दबध्द करणाऱ्या विद्यार्थ्यांना दमयंति वार्षिकांकाद्वारे खुले व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. विद्यार्थ्यांनीही त्याचा योग्य उपयोग करुन घेतल्याचे समाधान वाटते.

वार्षिकांकात महाविद्यालयाद्वारे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचे व विविध विभागाचेही प्रतिबिंब उमटले आहे.

हा वार्षिकांक पूर्णत्वास नेण्यासाठी मा. डॉ. आर. जी. राठोड साहेबांचे पूर्ण सहकार्य लाभले, मी त्यांचे मनस्वी आभार व्यक्त करतो. तसेच संपादन मंडळ व प्राध्यापक वृंद, विद्यार्थ्यांचेही कौतुक करून वार्षिकांक आपणास सुपूर्द करतो.

**डॉ. ए. पी. चर्जन**
प्राचार्य

# संपादकीय...

संपादकीय सदर लिहितांना मनस्वी आनंद वाटतो. कारण आम्ही पुन्हा एकदा दमयंति वार्षिकांक घेऊन वाचकांच्या सेवेत येत आहोत.

वार्षिकांकाद्वारे आम्ही विद्यार्थ्यांना लिहिते करण्याचा प्रयत्न करीत आहोत. विद्यार्थ्यांनी कविता, चारोळी, सुविचार इ. च्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

विद्यार्थ्यांना सामाजिक परिस्थितीचे भान असल्याची जाणीव त्यांच्या साहित्यातून होते. त्याचबरोबर महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहितीही वार्षिकांकात आली आहे. तसेच विविध विभागाच्या अहवालातून विविध उपक्रमांची माहिती मिळते.

हा वार्षिकांका पूर्ण करण्यासाठी श्री.गोविंदसिंह राठोड शिक्षण प्रसारक मंडळ, दहातोंडाचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. आर. जी. राठोड साहेबांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. मा. प्राचार्य ए. पी. चर्जन सरांचेही आभार व्यक्त करतो. त्याशिवाय संपादक मंडळातील इतर सदस्य, प्राध्यापक वृंद, विद्यार्थी गण यांचे ऋण व्यक्त करतो.

वार्षिकांक परीपूर्ण करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. तरीही राहिलेल्या उणीवांकडे दुर्लक्ष करून वार्षिकांकाचा स्वीकार कराल, अशी अपेक्षा ठेवून विराम घेतो.

**प्रा. एस.के. शाह**

## श्री. गोविंदसिंह राठोड शिक्षण प्रसारक मंडळ, दहातोंडा

### कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
| --- | --- | --- |
| १ | मा.डॉ. आर.जी. राठोड (एम.बी.बी.एस) | अध्यक्ष |
| २ | मा.सौ. दमयंतीबाई आर. राठोड | उपाध्यक्ष |
| ३ | मा.डॉ. श्री. व्ही. आर. राठोड (एम.डी.) | सचिव |
| ४ | मा.डॉ. श्री. अनिल आर. राठोड (एम.बी.बी.एस.डी.सी.एच) | सहसचिव |
| ५ | मा.डॉ. श्री. मोतिसिंह गो. राठोड (एम.एस) | सदस्य |
| ६ | मा.श्री. आर.एस. जाधव (से.नि.पो.अधि.) | सदस्य |
| ७ | मा.श्री. जी.बी. आडे (सामाजिक कार्यकर्ते) | सदस्य |

### स्थानिक व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
| --- | --- | --- |
| १ | मा.डॉ. आर.जी राठोड | अध्यक्ष |
| २ | मा.सौ. दमयंतीबाई आर. राठोड | उपाध्यक्ष |
| ३ | मा.डॉ. एम.जी. राठोड | सदस्य |
| ४ | मा.श्री. आर.एस. जाधव | सदस्य |
| ५ | मा.डॉ. विजय आर. राठोड | सदस्य |
| ६ | मा.डॉ. अनिल आर. राठोड | सदस्य |
| ७ | प्राचार्य डॉ. ए.पी. चर्जन | सचिव |
| ८ | प्रा.डॉ. ए.एस. निमकर | शिक्षक प्रतिनिधी |
| ९ | प्रा.डॉ. पी.एम. माकोडे | शिक्षक प्रतिनिधी |
| १० | श्री.पी.टी. राठोड | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |

श्री. गोविंदसिंह राठोड शिक्षण प्रसारक मंडळ, दहातोंडा

## श्री.डॉ. आर.जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय मूर्तिजापूर

### सल्लागार समिती

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.डॉ. आर.जी. राठोड | अध्यक्ष |
| २ | मा.सौ. दमयंतीबाई आर. राठोड | उपाध्यक्ष |
| ३ | मा.डॉ.विजय आर. राठोड | सचिव |
| ४ | मा.डॉ अनिल आर. राठोड | सचिव |
| ५ | मा.डॉ. एम.जी. राठोड | सचिव |
| ६ | मा.श्री. आर.एस. जाधव | सदस्य |
| ७ | मा.डॉ. के. एम. कुळकर्णी | सदस्य |
| ८ | मा.ॲड कृष्णकुमार मारवाल | सदस्य |
| ९ | मा.डॉ. अनंतकुमार भुईभार | सदस्य |
| १० | मा.इंजि. ए. आर. अग्रवाल | सदस्य |

# कविता

## नर हो, न निराश करो मन को

– कु. कल्याणी दुरतकर

कुछ काम करो, कुछ काम करो
जग में रहकर कर कुछ नाम करो
यह जन्म हुआ किस अर्थ अहो
समझो जिसमें यह व्यर्थ न हो
समझो जिसमें यह व्यर्थ न हो
कुछ तो उपयुक्त करो तन को
नर हो, न निराश करो मन को
संभलो कि सुयोग न जाय चला
कुछ व्यर्थ हुआ सदुपाय भला
समझो जग को न निरा सपना
पथ आप प्रशस्त करो अपना
अखिलेश्वर है अवलंबन को
नर हो, न निराश करो मन को
जब प्राप्त तुम्हें सब तत्त्व यहाँ
फिर जा सकता वह सत्त्व कहाँ
तुम सत्त्व सुधा रस पान करो
उठके उमरत्व विधान करो
दवरूप रहो भव कानन को
नर हो, न निराश करो मन को
निज गौरव का नित ज्ञान रहे
हम भी कुछ है यह ध्यान रहे
मरणोत्तर गुंजित गान रहे
सब जाय अभी पर मान रहे
कुछ हो न तजो निज साधन को
नर हो, न निराश करो मन करो

***

## भगवान के शाकिए

– कु. कल्याणी दुरतकर

पक्षी और बादल
ये भगवान के शाकिए है
जो एक महादेश से
दुसरे महादेश को जाते है !
हम तो समझ नही पाते हैं
मगर उनकी लाई चिठ्ठीयाँ
पेड, पौंधे, पानी और पहाड़
बाँचते है !
हम तो केवल यह आँकते हैं
कि एक देश की धरती
दुसरे देश को सुगंध भेजती है !
और वह सौरभ हवा में तैरते हुए
पक्षियों की पाँखो पर तिरता है !
और एक देश का भाप
दूसरे देश में पानी
बनकर गिरता है !

***



# वाटते वाटु द्या

– कु. कल्याणी दुरतकर

वाटते ते वाटु द्या
जेव्हा फुटत होती प्लेट
बालपणी तुमच्या कडुन
आता आई कडून फुटली
तर तिला काहीही बोलु नका
जेव्हा मागत होते फुगा
लहानपणी आई जवळ
आता आई चष्मा मागते
तर तिला नाही म्हणून नका तुम्ही
जेव्हा मागत होते चॉकलेट
लहानपणी आई गजवळ
आता आई औषध मागते
तिला आणायला विसरू नका तुम्ही
आई रागवत होती तुम्हाला
जेव्हा मस्ती करीत होता तुम्ही
आता तिला ऐकू येत नाही
तर तिला रागावू नका तुम्ही
जेव्हा चालत नव्हते तुम्ही
आई बोट धरून चालवत होती
आता ती चालु शकत नाही
तर तिचा हात पकडुन सहारा द्या तुम्ही
जेव्हा जन्मले होते तुम्ही
आई तुमच्या जवळ होती
जेव्हा आईचा शेवटचा क्षण येईल
तेव्हा तिच्याजवळ नक्की थांबा तुम्ही

***

# चारोळ्या

– संकलन – कु. रितु मौर्य

१) वीर असा मराठी मर्द मराठा
जिजाऊ त्याची माता,
शहाजी त्याचे पिता
स्वराज्याचे रणशिंग फुंकले,
हर–हर महादेव बोला
गौरव आला महाराष्ट्राला,
शिवबा छत्रपती झाला.

२) आई समजून घेतांना घेतली काळजाने भरारी
चुकीची ती झेप आई अंतरंगात सामावलेली

३) अजुन जगतो तो अभ्यास माझा
जीवन जगलो जे ग्रंथ माझे
शब्द यात्रेत वाहलो ती दिंडी
मराठी महान केली ज्यांनी ते संत माझे

४) तू उरि ठेवलेल्या निखाऱ्यास
मी हार्दीक शुभेच्छा दिल्या
विझू नये अंगारातील आग
गारा–गारांना सदिच्छा दिल्या

५) भिजलेल्या ओढणीतलं आभाळ
माझ्या उरी विसावते जेव्हा
तुझ्या तारूण्याच्या शब्दसरीत
सारा निसर्ग गंधधुंद होतो तेव्हा

६) तु चंचल चपल मदमस्त अलबेली
ढंगात तुझ्या छंदात तुझी गोड गाणी
हर सांज नशेली नि सकाळ धुंद
हरेक क्षण रम्य माझा संग तुझ्या निसर्गराणी

७) माझ्या काळजातल्या निखाऱ्याच्या
सखे साऱ्या ठिणग्या आहेत ह्या
वेदनागर्भी चारोळ्याच नव्हे
तुझ्या फुंकरेच्या देणग्या आहेत ह्या

८) बंदुकाऐवजी हातात फुले पहण्याचा
डोळ्यांचे स्वप्न साकार करायचे आहे
समता, बंधुता, एकता मना-मनात
रूजविण्याचा प्रयत्न करायचा आहे

९) काळीज कळीने मी
आर्त आरोळी घातली
ती म्हणाली वाह
छान चारोळी म्हटली

१०) मी एक रान फुल
स्नेह हीन गंध हीन
श्वास दे आर्त दे
निसर्ग तुझा रंगविन

११) अशिक्षित जरी जगला शिकविणारा
मानवतेचा मंत्र खरा पटविणारा
विश्व गाते महती त्याची थोरसंत तो
मुर्तिजापूरास माझ्या कर्मभूमी करणारा



***

# चारोळ्या

– कु. भारती रामचंद्र लव्हाळे

घरात काळोख शिरेल म्हणून
मी सगळी दारं लावून बसलो
आणि स्वप्नाच्या खुळेपनावर
अंधारात बसून हसलो

सुंदर लाटेवर भाळून
सुर्य तिच्याकडे आकर्षला
दिवसाची खुप आश्वासनं
देऊन रात्री मात्र फितूर झाला

चंद्राबरोबर चांदनी एकच असते
पण तीचं नक्की सांगता येत नाही
त्याला रोज बदलताही येईल पण
तिला ते जमणार नाही
गावातले सगळे रस्ते
रात्री गावाबाहेर पडतात
मला घरीच परतायचं असतं
पण ते मला रानात नेऊन सोडतात

रात्रीची जागी राहून
मी त्या चांदनीला बघत होती
ती सुध्दा माझ्याप्रमाणे
एकटीच हसत होती

नाही म्हणाले नसले तरी
हो सुध्दा बोलले नाही
तो विचारून थांबला तरी
मला काही सुचले नाही

तू सोडून जाशील म्हणून
मी वेडी झाली होती

आणि मी वेडी झाली म्हणून
तू सोडून गेलास
काय सांगू तुला
जग माझ्यावर हसतं
तुझ्यासाठी वेडी झाली
असं उगाच बोलतं

मन किती वेडं असतं
नको तिथे धावतं
आयुष्याला काय हवं आहे
हे त्याला बरोबर कळतं

तुझ्याशिवाय जगण्याचा
विचार आता करते
जीवन इथेच थांबलं बघ माझं
आता मरण्याचा विचार करते

सगळ्यान मध्ये तू असलास तरी
माझ्यासाठी तू खास आहेस
माझ्यासाठी तू खास आहेस
माझे कडक नियम दुसऱ्यांसाठी
तुला सगळं माफ आहे

शहाणं बनण्यापेक्षा मला
वेडं व्हायला आवडेल
तुझ्या सारख्या (दिड) शहाण्यावर
विश्वास ठेवायला आवडेल

जगणं असह्य झाल्यावर
मरणही उशिरा येते
दु:ख अजुन बाकी आहे
हे तेव्हा कळून येते

डोळ्यातून अश्रू ओळखला
की तोही आपला राहत नाही
वाईट याचं वाटतं की
दु:ख त्याच्या सोबत वाहत नाही
तुझ्या विषयी बोलताना
मी जरा विचार करते
माझ्याशिवाय कोणी नसेल
याची मी खात्री करते

तू मला फसवणार होतास कधीतरी
हे आधीच मला माहीत होतं
पण बरं झालं मला अद्दल घडली
हे मनच माझं मानत नव्हतं

तुझ्या आठवणी आठवण्याचा
रोग लागलाय मला
तुझ्याकडचं विसरण्याचं
औषध दे मला

तुझ्यापासून दूर जाताााना
मन जड झाले होते
चेहरा हसरा दाखवला तरी
डोळे भरून आले होते
डोळे भरून आले होते

मला हव्या असणाऱ्या व्यक्तिंपैकी
तू एक आहेस
पण तुझी इच्छा मी करू ???
तू तर माझाच आहेस

प्रेम करायचयं म्हटलं तर
कुणाशीही जमत  नाही

मनासारख्या जोडीदारा शिवाय
संसारात मन रमत नाही

कदाचित म्हणतान माणूस
नशिबावर अवलंबून असतो
हजारदा त्याच्याकडून फसुन
हित्याच्यावरच विश्वास ठेवतो
आभाळ बरसताना
सरळ दार लावून घ्यावं
नाहीतर स्वत:ला
दिशाहीन जाऊ द्यावं

पाऊस म्हणजे खरं सांगतो
परीक्षा असते स्वत:ची
किती गोष्टींची कबुली
आपण देत राहते स्वत:शी

कुठून तरी येऊन
पाऊस ईथला होऊन जातो
आणि माझ्यासोबत मी बनून
तो हळवा होऊन पाहतो

वेड्या क्षणी भास होाते
तू जवळ असल्याचा
डोळे उगीच दावा करतात
तू स्पष्ट दिसल्याचा
पाऊस एकदाचा पडून जातो
पावसाचे दिवस असले की
आसवांचं तसं नसतं, ते पुन्हा येतात
एकदा डोळे पुसले की

शब्द हा शेवटचा उपाय आहे
प्रश्नांचे उत्तर मिळायला
नाहीतर एक कटाक्ष पुरतो
मनातलं गुढ कळायला

पावसावरच्या निबंधाला
कधीच पूर्ण मार्क मिळत नाहीत
कारण मार्क देणारा आणि घेणारा
दोघांनाही ते कळत नाही

मनाची तहान
पाण्यानं भागत नाही
हे बरं आहे की सगळ्यांनाच
मनाची तहान लागत नाही

मला एक सुखी माणूस
त्याची दु:ख सांगत बसला
आणि माझा दाटून आलेला अश्रू
मी निमुटपणे पुसला

पहाटेआधी जाग येणं
किती त्रासदायक असतं
सोसून झालेलं आयुष्य
उघड्या डोळ्यांना दिसतं

एक निरंतर प्रवास सुरू होतो
माझ्याकडून माझ्याकडे
आणि तुला वाटतं मी निघालो
पाठ फिरवून तुझ्याकडे

***



# सुविचार

– संकलन – स्वाती गावंडे

१) भूल होना 'प्रकृति है। मान लेना संस्कृति है। और उसे सुधार लेना प्रगती है।

२) शांती की शुरूआत मुस्कराहट से होती है।

३) नसीब जिनके ऊँचे और मस्त होते हैं, इम्तिहान भी उनके जबरदस्त होते है।

४) व्यक्ति को हर वक्त अपनी कमजोरी
का प्रदर्शन
नही करना चाहिए।

५) जितना कठीण संघर्ष होंगा, जीत उतनी ही शानदार होंगी।

६) औरों के दम पर उडनेवाले अक्सर अपने पैरो पर चलने का हुनर भी भूल जाते है।

७) देने के लिए दान, लेने के लिये ज्ञान और त्यागने के लिए अभिमान सबसे उत्तम है।

८) सारे साथी काम के, सबका अपना मोल जो संकट में साथ दे वो सबसे अनमोल।

९) उत्तम प्रपंच याचेच नाव परमार्थ.

१०) लोकांना हवेहवेसे वाटणे, हीच जीवनाची फलश्रृती आहे.

११) आनंद ही देण्यासारखी वस्तु तर ती घेण्यासारखी वस्तु आनंदाचा स्वार्थ हाच खरा परमार्थ.

१२) इतरांकडे लक्ष देण्यापेक्षा सदैव आपल्याकडे लक्ष देणाऱ्या भगवतांकडे लक्ष ठेवावे.

१३) समज बरोबर असतो पण तुम्ही त्याला गैर करता.

१४) छोट्या वस्तू हातातून काढल्याशिवाय मौल्यवान वस्तू मिळत नाहीत.

१५) प्रमाणात खंत, प्रमाणात खेद असा आनंद प्रदर्शित करावा व दु:ख लपवावे.

१६) खरं मोठेपण नसताना उगीच मोठेपणा वाटणे हा फार मोठा घात आहे.

१७) पदरात पडलेले दान स्विकारताना अपराधीपणाची भावना नसावी.

१८) नाम घेणारा आपले अवगुण सुधारण्याच्या मागे लागतो.

१९) नाम घेणाऱ्याला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत.

२०) दया, दवा, दुवा आणि दौलत या चार शब्दांची उपमा झाली तर देणाऱ्यांची संख्या वाढेल.

***

# सुविचार

– कु. नेहा बद्रीप्रसाद पांडे

१) खंबीरपणे उभे राहा जग तमचे काही बिघडू शकत नाही.

२) नाते सांभाळायचे असेल तर चुका सांभाळून घेण्याची मानसिकता असावी.

३) मन ओळखणाऱ्यांपेक्षा मन जपणाची माणस हवीत.
कारण ओळ ही क्षणभरासाठी असेल तर जपवणूक आयुष्यभरासाठी.

४) गोड बोलण्याचं सोंग करणारा माणूस कधीच हितचिंतक नसतो.

५) परखून घेतलं तर कोणीच आपलं नसतं, समजून घेतलं तर कोणीच परकं नसतं.

६) कोणत्याही व्यक्तीने आपल्याा अधिकारांपेक्षा जास्त आपल्या हितासाठी लढावे.

७) दु:खाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाही.

८) मोठं काम करण्याचा एकच मार्ग आहे जे करत आहात ते प्रेमाने करा.

९) नेहमी सर्वांच्या सद्‌गुणांना पहाल तर सर्वगुण संपन्न बनाल.

१०) आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य मोठे असते.

११) छंद आपल्याला आयुष्यभर प्रेम करायला शिकवतात.

१२) जग प्रेमाने जिंकता येते शत्रूत्वाने नाही.

१३) दिवसात तुम्हाला एकही समस्या आली नसेल, तर तुम्ही चुकीच्या रस्त्यावरून जात आहात असे समजावे.

१४) स्वभावातील गोडीने आणि जीभेवरील माधुर्याने माणसे जोडली जातात.

१५) दोन गोष्टी सोडून मैत्री करा. एक मोठेपणा आणि दोन खोटेपणा.

१६) अनुभव हा महान शिक्षक आहे पण तो मोबदला मात्र फार घेतो.

१७) आवड आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही.

१८) विचार करून फायदा होत नसेल, तर खरच विचार करायला हवा.

१९) चिंता ही कुठल्याच दु:खावरचा उपाय नाही.

२०) यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.

२१) लोक तुमच्याशी कसे वागतात, हे त्यांचे कर्म; पण तुम्ही त्यावर कशी प्रतिक्रिया देता हे तुमचे कर्म.

२२) लक्ष्याशिवाय मार्ग नाही, धेयाशिवाय जीवन नाही.

२३) स्वत: शोध घ्या, स्वत:ला घडवा हेच खरं आयुष्य आहे.

२४) कधी कधी मोठ्यांनी छोटेपणा आणि छोट्यांनी मोठेपणा दाखवला तरनात्यांमधला आदर वाढतो.

२५) यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास, निर्भय आणि कणखर मनोवृत्तीची आवश्यकता भासते.

२६) अपयशी माणसे दोन प्रकारची असतात. एक विचारहीन कृती करणारे आणि दुसरे काहीच कृती न करता फक्त विचारच करणारे.

२७) उथळपणा दुर्बल स्वभावाचा दुर्गुण आहे. तत्परता हा व्यवसायाचा आत्मा आहे.

२८) संधी केव्हाच दरवाजा ठोठावत नाही. जेव्हा तुम्ही दार उघडता, तेव्हा ती समोर उभीच असते.

२९) अपयशाच्या कठीण खडकाखालीच यशाच्य पाण्याचा झरा असतो.

३०) अपमानाच्या पायऱ्यावरूनच ध्येयाचा डोंगर चढायचा असतो.

३१) संकट तुमच्यातील शक्ती, जिद्द पाहण्यासाठीच येत असतात.

***



# सुविचार

- कु. प्रतिक्षा बी. ठाकरे

१) कधीकधी जपमान सहन केल्याने कमीपणा येत नाही उलट आपले सामर्थ्य वाढते.
२) प्रेम हा जुगार आहे. माणसाचा जीव घेणारा जुगार आहे.
३) दुसऱ्याचा विचार करायला शिकला तोच खरा सुशिक्षित.
४) अंतर्बाह्य प्रांजळपणा हाच प्रितीचा प्राण होय.
५) शत्रुपासून मुक्त होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्याला आपला मित्र बनविणे होय.
६) जीवनाला अखेरची रेषा नसते क्षितीजासारखे वृंदावणारे आहे.
७) तडजोड हे आयुष्याचे दुसरे नाव आहे.
८) स्पर्श न करता विद्यार्थ्यांना शिक्षा करता येतो तोच खरा शिक्षक.
९) बुध्दी आणि भावना यांचा समन्वय म्हणजेच विवेक.
१०) जो दुसऱ्यांदा देतो त्याला देव देतो.
११) हसण्याशिवाय गेलेला दिवस व्यर्थ समजावा.
१२) आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही.
१३) प्रत्येक मनुष्य आपापल्या पापाचे ओझे स्वत:च्याच खांद्यावर वाहत असतो.
१४) तुम्ही आयुष्या किती माणसे जोडली यावरून तुमची श्रीमंती कळते.
१५) जी भक्तीचं रूप घेवू शकते तीच खरी प्रिती.
१६) थोरांचे सद्‌गुण घेणे हिच त्यांना वाहिलेली खरी श्रध्दांजली.
१७) दु:ख विभागल्याने कमी होते आणि सुख विभागल्याने वाढते.
१८) आचारांच्या उंचावर विचारांची भव्यता अवलंबून असते.
१९) मनुष्याची मुद्रा म्हणजे जीवनग्रंथ. डोळे म्हणजे तर जीवनातील अनुभवाने भरलेले डोह.
२०) दु:ख कवटाळत बसू नका ते विसरा आणि सदैव हसत रहा.
२१) ज्यांना जास्त गोष्टीची हाव असते त्यांना प्रत्येक गोष्टीची कमतरता असते.
२२) मरण हे अपरीहार्य आहे त्याला भिऊ नका.
२३) संसारात एकमेकांच्या सुखापेक्षा दु:ख वाटुन घेण्यात फार मोठा आनंद असतो.
२४) खरं काव्य प्रणयाच्या पहिल्या फुलोर्यात नाही ते संसारात त्या फुलांच्या निर्माल्यात आहे. ते सुखदु:खाचा संमिश्र अश्रुत आहे.
२५) स्वप्न आणि सत्य यात साक्षात परमेश्वर उभा असतो.
२६) खरे आहे तेच बोला, उदात्त आहे तेच लिहा, उपयोगाचे आहे तेच शिका आणि देशहीताचे आहे तेच करा.
२७) जो लवकर रागावतो व लवकर शांत होतो त्याची हानी कमी व लाभ अधिक.
२८) जो द्रव्य वाढवतो तो काळजी वाढवितो. परंतु जो विद्या वाढवितो तो ज्ञान वाढवितो.
२९) माणसाची चौथी मुलभूत गरज म्हणजे पुस्तक.
३०) ज्याला काय लिहावं यापेक्षा काय लिहून नये हे कळतं तोच खरा लेखक.
३१) रिकामं पोतं सरळ उभच राहू शकणार नाही.
३२) स्त्री ही क्षत्रियाची आणि अनंतकाळाची मात असते.
३३) आयुष्यात कोणतीही नाती ठरवुन जोडता येत नाही.
३४) ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे.
३५) विद्यार्थी हा विजेवर चालणारा राजहंस पक्षी

# सुविचार

– कु. ज्योती भालेरावे

१) भरलेला खिसा माणसाला दुनिया दाखवतो. रिकामा खिसा मात्र दुनियेतील माणसं दाखवतो.

२) स्वभावातील गोडीने आणि जिभेवरील माधुर्याने माणसे जोडली जातात.

३) ज्याच्या जवळ उमेद आहे तो कधीही हरू शकत नाही.

४) चुकणं ही प्रकृती मान्य करणं ही संस्कृती आणि सुधारणा करणे ही प्रगती आहे.

५) समजवण्यापेक्षा समजून घेण्यामध्ये खरी परीक्षा असते. कारण समजवण्यासाठी अनुभवाचा कस लागतो तर समजून घेण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो.

६) आज निदान एक पाऊल पुढे टाकीन, निदान एक काम पुर्ण करीन, निदान एक अडथळा ओलांडीन, निदान प्रयत्न तरी करीनच करीन.

७) जीवनात चांगल्या माणसांना शोधु नका स्वत: चांगले व्हा आणि कुणीतरी तुम्हाला शोधत येईल.

८) विजेते वेगळ्या गोष्टी करत नाही तर ते प्रत्येक गोष्ट वेगळीपणाने करतात.

९) जिंकणे म्हणजे नेहमी फक्त पहिला येणे असे नसते. एखादी गोष्ट पुर्वीपेक्षा जास्त चांगली करणे म्हणजे जिंकणे होय.

१०) खुप माणसांची स्वप्ने या एका विचारामुळे अपुर्ण राहतात तो म्हणजे लोक काय म्हणतील.

११) भुक आहे तेवढे खाणे ही प्रकृती, भुक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती आणि वेळप्रसंगी स्वत: उपाशी राहुन दुसऱ्याची भुक भागविणे ही संस्कृती.

१२) तुम्ही गरीब म्हणून जन्माला आलात यात तुमचा काही दोष नाही पण जर तुम्ही गरीब म्हणून मेलात तर हा नक्कीचा तुमचा दोष असतो.

१३) मानवाचा दानव होणे ही त्याची हार मानवाचा महामानव होणे हा त्याचा चमत्कार आणि मानवाचा माणूस होणे हे त्याचे यश आहे.

१४) शरीराला श्रमाकडे, बुध्दीला मनाकडे आणि ह्रदयाला भावनेकडे वळविणे म्हणजे शिक्षण होय.

१५) कोणी कौतुक करो किंवा टिका लाभ तुमचाच. कौतुक प्रेरणा देते तर टिका सुधारण्याची संधी देतो.

***



# दोस्ती

– यास्मिन रशिद चाऊस

मैत्री जीवनात अमृताप्रमाणे मधुर असते, जेवढी तुम्ही इतरांना द्याल तेवढीच परत मिळते.

मैत्री प्रत्येकाच्या आयुष्यातला एक अविभाज्य घटक. ज्याला रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. मैत्री ही अशी जगा आहे जेथे सुखाची सुरूवात होते. आपल्या आयुष्यात अनेक वळणं अशी येतात की, ती आपल्याला चांगल्या वाटेने नेतात तर कधी–कधी वाईट दिशेने जाण्यासाठी प्रोत्साहीत करतात. गुलाबाचे काटे आणि फुल निवडणं जरी आपल्या हातात असले तरी नाईलाजास्तव कधी–कधी फुलाला दुर करून काट्याला जवळ करायचं लागतं. अशा चांगल्या वाईट अनुभवांमधून माणूस शिकत असतो. त्यातुनच त्याला चांगल्या वाईटाचं वर्गीकरण करता येते पण कधी–कधी चांगल्या वाईटातला भेद लक्षात यायला फार उशीर होतो. त्यामुळे अनेकांचे आयुष्य उद्‌वस्त होतात. अशावेळी आपल्याला सावरण्याचे काम करतो तो आपला मित्र

''नाजुक पाकळ्या किती सुंदर असतात,

रंगीत कळ्या रोजच उमलत असतात

नजरेत भरणारे सर्वच असतात,

परंतु हृदयात घर करणारे मित्र

फारच कमी असतात.''

प्रामाणिक मित्र जीवनात पाण्यासारखी असतात रंग नाही, आकार नाही, ठिकाण नाही तरी सुध्दा जीवन जगण्यासाठी महत्त्वाची ....

प्रत्येकाच्या आयुष्यात असा जवळचा मित्र असतोच, त्याला वयाचे बंधन नाही. मैत्री ही कधीही कोणीही सोबत होऊ शकते. म्हणूनच भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून लहान असो वा मोठा काही तरी चांगले घेण्याचा, शिकण्याचा प्रयत्न असतो कारण आपण त्यांना आपला मार्गदर्शक, आपला गुरू मानत असतो, प्रत्येक गोष्ट त्यांच्यासोबत वाटत असतो. ते आपल्या सुख–दु:खाचे वाटेकरी असतात. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर क्षणाक्षणाला भेटणाऱ्या व साथ देणाऱ्या सर्व मित्रांना शेवटी एवढचं सांगावं वाटते.... मित्र म्हणजे ...

मित्र – सुखात आपल्या सामावून घेतो.

मित्र – संकटात मदतीला धावून येतो.

मित्र – चार शब्द ऐकवायला कचरत नाही.

मित्र – यशामध्ये आपल्याला विसरत नाही.

मित्र – शिकवतो आयुष्य जगायला.

मित्र – प्रेम करतो, रागावतो सुध्दा.

मित्र – खुप बोलतो, न बोलतो सुध्दा.

मित्र – देवासारखा असतो.

मित्र – म्हणजे आपणच ...

***



## आई

– कु. प्रियंका अशोक मेहसरे

मन मंदीराच्या गाभाऱ्यात शिरूनी
करशी तु वास, तेव्हाच माझ्या आयुष्यात येई
खरा सुवास ।। धृ ।।
मी पाहिली आहे, माते, तुझी ती तळमळ,
माझ्याचसाठी लावूनी घेशी तु जीवाला हळहळ,
आई, थोर आहे तुझे ते उपकार
कसे विसरू ते मी सांग बरं ! ।। १ ।।
ह्रदयती माझ्या सजली असे तुझीच मूर्ती,
दाहीदिशा पसरो माझीच कीर्ती,
अशी आहे माते, तुज आस,
आई तुज आहे माझ्यासाठी खास ।। २ ।।
तुझी ती माया, ममता तुझी थोर,
आई मी आहे तुझीच अज्ञानी पोर,
तुच आहे माते, माझा गुरू,
अन् तुच आहे माझा कल्पतरू ।। ३ ।।

***

## घर

– नितिन गजानन लेंडे

चिडीयाँ होती है लडकियाँ मगर
पंख नही होते लडकियों के.......
मायके भी होते
ससुराल भी होते हैं मगर,
घर नही होते लडकियों के...
मायका कहता है
बेटीयाँ पराई होती है।
ससुराल कहता है
ये पराये घरसे आई है।
ये खुदा अब तू ही बता....
आखीर ये बेटीयाँ किस ??
घर के लिए बनाई है।

***

## आयुष्य

– कु. रुपाली संजय शेंडे
(बी.ए. भाग – १)

आयुष्याच्या वाटेवर चालत असताना
सुख दु:खाशी नातं जोडायचं असतं
भांडण तंटा झाले तरीही
मनानेच मनाला समजायचं असतं
दुसऱ्यांना दु:ख देऊन
कधीच स्वत:ला सुख मिळत नसतं
म्हणून दुसऱ्याचे दु:ख वाटून
त्यांना सुखी करायचं असतं
कितीही दु:ख झाले तरी
आनंदाने जगायाचं असतं
नेहमी नाही पण कधी तरी
इतरांसाठी जगायचं असतं
काल होते आज नाही
म्हणून रडत बसायचं नसतं
आज नाही पण उद्या मिळवायचं
यासाठी नेहमी लढायचं असतं
आयुष्याच्या या खेळात
आनंदाने खेळायचं असतं
खूप काही हरलो तरी आणखी
बरच काही जिंकायचं असतं.

***



# मी कशी

– यास्मिन रशिद चाऊस

मी अशीच आहे माझ्याशीच हितगुज करणारी
प्रश्न मलाच विचारून उत्तर मीच शोधणारी !!
मी अशीच आहे जपून जपून चालणारी
पाऊल पाऊल चालतांना सावलीलाही तोलणारी !!
मी अशीच आहे सुखालागे खळखळून हसणारी
दुःखाची शाल अंगावर जरी वेदना आतून-
आतून सोसणारी !!
मी अशीच आहे गुढ अंतरंगातल्या डोहात बुडणारी
एखाद्या प्रशांत समयी धागा उकलून-उकलून
विणणारी !!
मी अशीच आहे माझ्याकडे कधी निर्विकारपणे
पाहणारे किती कवडसे मनाचे आणि बांध पुन्हा
पुन्हा सांधणारी !!
मी अशीच आहे माझ्या वर्तुळात जगणारी
उंची भरारीच स्वप्न पाहुनही माझ्या परिघाला
जपणारी !!
मी अशीच आहे डोळे मिटून माझं स्वप्न पाहणारी
स्वप्नातल्या माझ्या आशेचा किरण शोधणारी !!

***

# माँ आपकी याद

– पुरुषोत्तम ई. जयस्वाल (बी.ए. भाग-२)

आपसे दुर होकर दुनिया मेरी खो जाती है।
माँ आपकी याद मुझे बहोत सताती है।।
आपसे दुर होकार भी आपकी,
हर बात याद आती है।
माँ आपकी याद बहोत सताती है।।
आपसे दुर होकर भी आपकी,
करिबी मुझे बुलाती है।
आपकी लोरी के बिना निंद,
कहा मुझे आती हैं।।
माँ आपकी याद मुझे बहोत सताती है।
माँ आपकी याद .....



# पेंशन

– पुरुषोत्तम ई. जयस्वाल
(बी.ए. भाग-२)

संपली एकदाची नोकरी
नाही कशाचे टेंशन
नाही-नाही म्हणता-म्हणता
कधी येते पेंशन
कधी येते पेंशन
संपत नाही समस्या
बाकीच आहे जीवन
नाही-नाही म्हणता-म्हणता
कधी येते पेंशन
आयुष्याच्या शेवटी
सोडला सर्वांचा पिच्छा
नाही आता आयुष्यात
आहे कशाची इच्छा

***




# माझे महाविद्यालय

– कु. लक्ष्मी मधुकर तायडे
(बी.ए.भाग-१)

आली तेंव्हाच कळले
जावेच लागेल कधी ना कधी
वेळ ती आली आता
स्मृती घेऊन आली
आचारण नि सुविचार
सांगितले जातात इथे,
जीवनातील कला
कलेनी साकारते इथे,
विविध कार्यक्रमांचे ठसे
सुप्त गुणांचा विकास इथे,
वाढते किर्ती यशाची
भावना एकात्मतेची इथे,
सर्व ज्ञानरूपी गुणांचे
विद्यालय प्रिय ते,
अशा या महाविद्यालयाला
नाव शोभे 'आर. जी. राठोड' चे
ज्ञानार्जनाचे बांधामृत
मिळाले आम्हा इथे,
कर्तव्य आणि कर्तृत्व
समजाविले आम्हा इथे,
वेळ आणि शिस्त
जोपासली जाते इथे,
या 'आर. जी. राठोड'च्या हिरकणांनो
जुन्या स्मृती घडवा इथे,
शेवटी प्रणाम करतो
अन एक प्रार्थना असे
पुज्य ते मंदिर आम्हा
तैसे पुज्य ते तुम्हा असे.

***



# धरती

– कु. मयुरी राजेश वाकोडे

धरती गं धरती तुला होत नाही का त्रास
तुला वाटत नाही का सन्यास
माणूस जर तुला काहीच समजत नाही
जशी तु माणसाला मदत करत नाही
तू नसती तर आम्ही असतोच का ?
तुझा हा इतका सहनशीलपणा
तू कशी करते गं एवढे सहन हा संन्यास
तुला कधी कंटाळा येत नाही का
कधी तुला वाटत असेल नं
आता देऊ का आपटून बरं !
पण तू एवढी महान की आमचा त्रास सहन
करते आणि आम्हाला एवढं पिक देते
धरती गं धरती
पण मला तू वाटतेस महान !

***



# स्वप्नातून सत्याकडे

- हरिश बी. मुसळे (बी.एस्सी.भाग -३)

*बॉडी लँग्वेज : अत्यावश्यक यशाचा मार्ग*

विद्यार्थी मित्रांनो, तुम्हाला एक यशस्वी विद्यार्थी म्हणून सर्वांनी ओळखावे, असे वाटत असेल तर तुमच्या भात्यामध्ये अनेक प्रकारची अस्त्रे अत्यावश्यक आहे. वेगवान निर्णयक्षमता, उत्कृष्ट संवादकौशल्य, वेळेचे प्रबंधन करण्याचे तंत्र, योग्य अभ्या करण्याच्या पध्दती अशासारखी कितीतरी अस्त्रे त्या विद्यार्थ्यांजवळ असतात ज्यांना आपण यशस्वी विद्यार्थी म्हणून ओळखतो.

आत्ताच आपण ज्या अस्त्रांचा उल्लेख केला त्याच्याशिवाय एक अजून महत्त्वाचे आणि पावरफूल अस्त्र यशाच्या पायऱ्या चढायला मदत करू शकते, ते म्हणजे तुम्हाला नसलेला देहबोली (—) चा अभ्यास. तुमच्या मनात जे भाव आहेत, ते तुमचे शरीर दाखवित असते. असे कधीही होत नाही की तुमच्या मनात एक भाव आहेत आणि तुम्ही दाखवता दुसरे. तुमच्या मनात जर लबाडी करण्याचे विचार असतील तर तुमच्या शारीरिक हावभावातून आपोआपच तशाच प्रकारचे भाग तुमचे शरीर प्रदर्शित करीत असते.

तुमच्या माहितीसाठी येथे नमूद करणे आवश्यक आहे की,''देहबोलीचा अभ्यास'' ही संकल्पना तुम्हाला सुरूवातीला समजायला थोडी किचकट वाटू शकेल, परंतु जेव्हा तुम्हाला सगळं व्यवस्थित समजेल तेव्हा तुम्हाला वाटेल की, विद्यार्थ्यासाठी जर हे एवढे महत्त्वाचे आहे, हे तर सगळे आपल्याला आधीच का नाही समजले. आपले शरीर कधीही खोटे बोलत नाही. आपले शरीर आपल्या मनातील भाव आपल्याला नकळत अगदी सहज प्रदर्शित करीत असते. जर आपल्याला ते समजले तर कोणाच्या मनात काय चालले आहे, हे सुध्दा आपल्याला कळू शकेल. आपले शरीर आणि आपले मन या दोघांमध्ये जे संभाषण सुरू असते. त्यालाच देहबोली किंवा बॉडी लँग्वेज असे म्हणतात. तुमच्या मनात जे विचार सुरू असतात तेच विचार तुमच्या शरीराद्वारे बिनचूक दाखविले जातात जर बॉडी लँग्वेज या विषयाचा आपला चांगला अभ्यास असेल तर आपण कोणती व्यक्ती कशी आहे, याविषयी त्या व्यक्तीने न सांगताही जाणून घेऊ शकतो.

बॉडी लँग्वेजचा अभ्यास करून त्यामध्ये जर तुम्ही तरबेज झालात तर एक विद्यार्थी म्हणून प्रचंड फायदे आहेत. तुम्ही अभ्यासात एकाग्र कसे व्हायचे, वर्गात शिक्षक शिकवित असतांना इतर कोठेही लक्ष कसे जाणार नाही, तसेच शिक्षकांच्या मनात आपल्याबद्दल काय सुरू आहे किंवा त्यांच्या काय अपेक्षा आहेत, विद्यार्थ्यांच्या मनात काय सुरू आहे, ते खरे बोलतात की नाही वगैरे याचा अंदाज बांधू शकतात. तुमचे मित्र कसे आहेत हेही सहज समजू शकतात. बॉडी लँग्वेजचा उपयोग तुम्हाला वेगवेगळ्या परीक्षा देतांना, ग्रुप डिस्कशन किंवा नोकरीच्या वेळी वैयक्तीक मुलाखत देतांना मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो.

बॉडी लँग्वेजचा अभ्यास करणे किंवा त्यावर प्रभुत्व मिळविणे ही एक कला आहे आणि म्हणूनच ती आत्मसात करणे शक्य आहे. या विषयाचा अभ्यास करण्याआधी तुम्हाला एक बाब माहित झाल्यावर निश्चितच आश्चर्य वाटेल की, बॉडी लँग्वेज या विषयाची निसर्गदत्त स्वरूपात माहिती स्त्रियांना पुरूषांपेक्षा कितीतरी जास्त असते. त्यामुळे आमच्या विद्यार्थी मैत्रीणींची कमीत कमी इयत्ता दहावीपर्यत विद्यार्थी मित्रांपेक्षा गुणवत्ता यादीत जास्त संख्या दिसते.

मित्रांनो, तुम्हाला माहीत असू द्या की, विद्यार्थी मैत्रीण या कोणतेही शारीरिक संकेत तुमच्यापेक्षा पटकन आणि संपूर्ण स्वरूपात समजून शकतात दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलीशी खोटे बोलले तर त्यांना लगेच कळते. परंतू चेहऱ्यावरचे भाव न बदलता त्या इतक्या सफाईतपणे खोटे बोलू शकतात की, त्यांचे खोटे पकडणे फारच कठीण असते.

***



# माणसा, माणसा कधी होशील माणूस ?

– कु. सोनाली अशोक मेहसरे

आज माणसातला माणूस हरवला आहे ! खराखुरा मानव अस्तंगत झाला आहे. आता उरला आहे फक्त मानवरूपी दानव. आजच्या युगात पावलोपावली आपल्याला मानवाच्या क्रुरतेचा प्रत्यय येतो. आजारी माणूस केवढ्या आशेने आपल्यावर उपचार करून घेत असतो पण काही वेळा चुकीच्या उपचारांमुळे व अक्षम्य हलगर्जीपणामुळे माणूस मृत्युमुखी पडतो. नेत्रदोष दूर व्हावा म्हणून माणूस नेत्रोपचार करून घेतो ; पण काही वेळा औषधातील भेसळ आणि शस्त्रक्रियेतील हलगर्जीपणा यामुळे त्याला कायमचे अंधत्व येते. ही भेसळ कोण करतो ? अर्थात मानवात दडलेला दानव करतो.

